# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-९६/२०२५** **दिनांक- २६/०२/२०२५**

## प्रेस नोट

**" रात्रीच्यावेळी दुकान/घर फोडुन दुकानामधुन ७,००,०००/रुपये रोख रक्कम चोरी करणा-या सराईत आरोपीताला अटक करुण त्याच्याकडुन ४,५०,०००/रुपये रोख रक्कम हस्तगत करण्यात काशीगांव पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश'**

दि.२३/०२/२०२५ रोजी फिर्यादी नांमे श्रीमती बिस्मीला अकबर मुजावर वय-७० वर्षे, रा. गाळा नं. ११ ग्रिनवुड अपार्टमेट, राज लाईफस्टाईल पुढे हटकेश, काशिगांव मिरारोड पुर्व यांनी तक्रार दिली कि, दिंनाक २०/०२/२०२५ रोजी रात्री ११.०० वा. फिर्यादी हे त्यांचे दुकान/घर बंद करुण अंकलेश्वर, गुजरात येथे परिवारासह गेल्या होत्या दिनांक २२.०२.२०२५ रोजी गुजरात येथुन त्यांच्या घरी/दुकानात आले असता त्यांना त्यांच्या दुकानाचे/घराचे ग्रील तुटलेले दिसले त्यावेळी घरात/दुकानात ठेवलेले ७,००,०००/ रुपये रोख रक्कम चोरी झाल्याचे लक्षात आले त्यांच्या तक्रारी वरुन काशिगांव पोलीस स्टेशन गु.र.नं । ८८/२०२५ भा.न्या.सं.कलम. ३०५,३३१(३),३३१(४) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवुन वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी घटनास्थळी भेट देवुन दाखल गुन्हा उघड करण्याच्या सुचना काशिगांव पोलीस स्टेशनच्या अधिकारी व अंमलदार यांना देण्यात आल्या होत्या. काशिगांव पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी कौशल्यपुर्ण तपास करुन आरोपी नामे. ईस्माईल ईसाक शेख वय-२७ वर्षे, व्यवसाय बेकार, रा.रुम नं. ३२० साईबाबाचाळ, जनतानगर डोगंरी, काशिगाव, मिरारोड ता. जि. ठाणे यांस दिनांक २३.०२.२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीताच्या ताब्यातुन एकुण ४,५०,०००/रुपये रोख रक्कम तसेच आरोपीताने चोरी केलेल्या रक्कमेतुन खरेदी केलेले ओप्पो कंपनीचे ०२ मोबाईल फोन व स्वःत करिता खरेदी केलेले २५ जोड कपडे इत्यादी मुद्देमाल त्यांच्याकडुन हस्तगत करण्यात आला आहे.

अटक आरोपीची पार्श्वभुमी तपासली असता त्यांच्या विरुद्ध काशिमिरा पोलीस स्टेशन,मिरा रोड पोलीस स्टेशन तसेच काशिगांव पोलीस स्टेशन येथे गंभीर स्वरुपाचे जबरी चोरी व घरफोडी असे एकुण १० गुन्हे दाखल आहे. नमुद दाखल गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश तोगरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक/ अभिजीत लांडे हे करत आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०१, मा. श्री. डॉ. विजय मराठे, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरा रोड विभाग, महेश तोगरवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिगांव पोलीस स्टेशन, अभिजीत लांडे, राणा परदेशी, पोलीस उप निरीक्षक, गुन्हे प्रकटीकरण शाखा, तसेच गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अंमलदार पो.हवा/प्रताप पांचुदे, पो.शि विक्रांत खंदारे, पो.शि.उमंग चौधरी, पो शि. किरण विरकर, पो.शि.टोबर, पो.शि. रविंन्द्र सोनावणे, पो.शि. नामदेव देवकाते, पो.शि. आभिषेक मढावी यांनी केली आहे.







------oooo-----